आर.सी.सी.क्र.११३/२०१६
शासन वि. प्रभाकर
<u>निशाणी क्र. ५६</u>

<u>साक्षीदार क्र.</u>

| | | |
|---|---|---|
| नांव | : | श्री. चंद्रकांत दिगंबर शेनमारे, |
| वय | : | ४५ वर्षे, |
| व्यवसाय | : | शेती, |
| पत्ता | : | पिंपळा बुद्रुक, ता.तुळजापूर जि. उस्मानाबाद. |

<u>सरतपास स.स.अ.श्री.एस.एस.धुमाळ सरकार पक्षातर्फे</u>

१. घटना हि ७ वर्षापूर्वी सकाळी ७.०० वाजता आरोपीच्या सरबांधावर घडली. सदरच्या दिवशी मी शेतात चाललो होतो. त्यानंतर मी आरोपीच्या सरबांधावर पोचलो. त्यानंतर तेथे आरोपी क्र. १, २ व ५ आले. त्यानंतर तेथे आरोपी क्र. ३ व ४ आले. तेंव्हा तेथे आरोपी क्र. १ ने मला इथुन का चालला असे म्हटले. तेंव्हा मी त्यांना मला तहसिलदार यांनी मला सरबांधावरुन जायचे सांगितले आहे. त्यामुळे मी तेथुन जाणार असे सांगितले. तेंवहा आरोपींनी मला इथुन कसे जाणार असे म्हणुन मारहाण करायला सुरुवात केली. तेंव्हा आरोपी क्र. २ ने मला काठीने डोक्यात मारले व आरोपी क्र. १ ने मला दगडाने उजव्या पायाच्या गुडघ्याला मारले. त्यानंतर आरोपी क्र. ५ ने मला लाथाने मारले. तसेच आरोपी क्र. ३ व ४ ने मला लाथाबुक्याने मारहाण केली. त्यामुळे मी बेशुध्द पडलो. त्यानंतर माझ्या मुलाने माझा मोठा भाउ अरुन दिगंबर शेनमारे यांना फोन केला.

२. त्यानंतर त्यांनी मला महादेव कोपे यांच्या टमटममध्ये टाकून सिध्देश्वर हॉस्पीटल येथे नेल्याचे मला माझ्या मुलाने, पुतण्याने व भावाने सांगितले. तेथे मी ६ दिवस ॲडमीट होतो. त्यानंतर मी दवाखान्यातून घरी आल्यानंतर पोलीस ३ ते ४ दिवसानंतर चौकशी कामी आले. मला ज्या काठीने व दगडाने मारहाण झाली ते दाखवल्यास मी ओळखु शकतो. आता मला सदरची काठी व दोन दगड दाखवले. ते तेच आहेत. सदरची काठी वस्तु क्र. अ कडे आहे व मोठा दगड वस्तु क्र. ब कडे व लहान दगड वस्तु क्र. क कडे आहे. आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकतो. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पी. बी. कोळेकर</u>**

३. हे म्हणणे खरे नाही की, दि. १३.०८.२०१६ रोजी आरोपी क्र. १ हे त्यांच्या सरबांधावर गवत काढत बसले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेंव्हा मी, लक्ष्मण शेनमारे, महादेव शेनमारे, रामा शेनमारे, संजय करंडे, अरुन शेनमारे, मंगल शेनमारे व विमल करंडे तेथे आलोत. हे म्हणणे खरे नाही की, तेंव्हा मी आरोपी क्र. १ ला बांधावर काठाडया का टाकल्या म्हणुन शिविगाळ करण्यास सुरुवात केली. हे म्हणणे खरे नाही की, तेंव्हा आरोपी क्र. १ ने मी काठडया टाकल्या नाहीत त्या पावसाने आल्या आहेत असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेंव्हा मी माझ्या हातातील काठीने आरोपी क्र. १ च्या उजव्या हाताच्या मनगठावर मारले. हे म्हणणे खरे नाही की, तेंव्हा लक्ष्मण शेनमारे याने आरोपी क्र. १ च्या पोटावर लाथा मारल्या. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मणने आरोपी क्र. १ च्या उजव्या पायावर दगड मारुन जखमी केले. हे म्हणणे खरे नाही की, मी तेंव्हा

आरोपी क्र. १ ला माझ्या हातातील काठीने पाठिवर व डाव्या बरगडीवर मारुन जखमी केले. हे म्हणणे खरे नाही की, तेंव्हा महादेव शेनमारे, संजय करंडे व अरुन शेनमारे यांनी आरोपी क्र. १ ला लाथाबुक्याने मारहाण करुन जखमी केले.

४. हे मला माहित नाही की, आरोपी क्र. १ ने माझ्या विरुध्द तामलवाडी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला मारहाण केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना मारहाण केली त्यामुळे आरोपीला जखम झाली त्यामुळे आरोपीने सदरची केस मिटवून घ्यावी म्हणुन मी प्रस्तुतची केस आरोपी विरुध्द केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by KULDIP SUBASH KULKARNI
Date: 2023.08.21 18:03:48 +0530

दिनांकः २१.०८.२०२३ २रे प्रथमवर्ग न्यायादंडाधिकरी, तुळजापूर.